# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - १ ऑगस्ट २०२४

-----------------------------------------------------------------------------------------------------------

जळगाव दि.१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सिस्टीम ॲनालिस्ट कपिल गिरी आणि वरिष्ठ सहाय्यक स्वाती तायडे हे दोघे ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त झाले त्यानिमित्ताने त्यांच्या सेवेचा गौरव करण्यात आला.

विद्यापीठातील संगणक केंद्रातील सिस्टीम ॲनालिस्ट या पदावर कार्यरत असलेले कपिल गिरी हे विद्यापीठात २५ वर्ष सेवा केल्यानंतर नियतवयोमानानुसार विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच वित्त विभागातील वरिष्ठ सहाय्यक स्वाती तायडे यादेखील विद्यापीठात ३० वर्षे सेवा केल्यानंतर नियतवयोमानानुसार विद्यापीठ सेवेतुन सेवानिवृत्त झाल्या आहेत. या दोघांचा सेवागौरव समारंभ प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे आणि कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी दोघांना विद्यापीठातर्फे स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. तसेच विद्यापीठातील कर्मचारी अधिकारी संघटना आणि मागासवर्गीय कर्मचारी संघटना तसेच कर्मचारी पतपेढी यांच्यातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रवीण चंदनकर यांनी केले.

बातमी क्र. २

जळगाव दि.१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन व अध्ययन व विस्तार विभागाद्वारे प्रमाणपत्र, पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ झाला असुन १५ ऑगस्ट पर्यंत प्रवेश मुदतवाढ देण्यात आली आहे.

तळागाळातील व्यक्ती शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच ज्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही, अथवा नोकरी करीत असल्यामुळे, घराची जबाबदारी अंगावर पडल्यामुळे पदवीधर होता आले नाही, अशा विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार व व्यवसाय करणाऱ्या महिला, शासकीय/निमशासकीय कर्मचारी, सामाजिक क्षेत्रात काम करणारी व्यक्ती अशा सर्वांसाठी बाहेरून शिक्षण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाने उचललेले एक अभिनव पाऊल आहे. सर्व शिक्षणक्रमांची संरचना आणि अंमलबजावणी प्रक्रिया नवीन शैक्षणिक धोरण -२०२० नुसार सत्र पध्दतीने आहे. आजीवन विभाग हा विद्यापीठातीलल वेगळेपण जोपासणारा विभाग आहे. या विभागाद्वारे आपले पदव्युत्तर शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून विद्यापीठाचे नावलौकिक जोपासले आहे.

या विभागातर्फे मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, संरक्षण व सामरिक शास्त्र, समुपदेशन मानसशास्त्र हे विषय घेऊन एम.ए. करता येईल आणि एम.ए. (शिक्षणशास्त्र), एम.कॉम. हे अभ्यासक्रम करता येणार आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सेमिस्टर पध्दती असल्याने वर्षातून दोन वेळा परीक्षांचे आयोजन , प्रवेश ते पदवी प्रदान अंतर्गत ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने अंमलबजावणी प्रक्रिया , प्रवेशीत विद्यार्थ्यांना

विषयानुसार स्वयंअध्ययन साहित्य ई-स्वरूपात उपलब्ध, विविध स्पर्धा परीक्षा, पीएच.डी., नोकरीसाठी पदवीस मान्यता आणि समान संधी. रविवारी तसेच सुट्टीच्या दिवशी संमंत्रण सत्रांचे ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने (Councelling Session in Hybrid Mode) आयोजन केले जाईल.  अधिक माहितीसाठी कार्यालयाचे फोन नंबर ०२५७-२२५७४९५/२२५८४९६ या क्रमांकावर संपर्क साधावा. अथवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) संपूर्ण माहिती पाहता येईल, अशी माहिती संचालक प्रा. आशुतोष  पाटील यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

**आपला विश्वासू**

**जनसंपर्क अधिकारी**